वर्ष २४ वे

अंक २ रा

**सर्व सभासद / हितचिंतकांस आग्रहाचे निमंत्रण**

# वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम - निमंत्रण पत्रिका

**-: कार्यक्रमाचे स्थळ :-**

**इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीयर्स,**

मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.

**रविवार दि.२५.०८.२०२४ रोजी सकाळी १०.०० वा.**







# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)

**Website : http://www.parnermitramandalpune.com/**

**यांचे मुखपत्र**

# संवाद

ऑगस्ट २०२४

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

## वसतिगृहाची वैशिष्ट्ये
(मुलांचे)

- **वाय-फाय सुविधा उपलब्ध.**
- **विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका.**
- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले व पार्किंग).
- प्रत्येक मजल्यावर ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या.
- खोलीचा आकार १०' x १४'
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

## आपण यापैकी काय करु शकतो?

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ५१००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं.१७/४अ, मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

( दिनांक : १० ऑगस्ट, २०२४ )

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि.२५.०८.२०२४** रोजी **सकाळी १०.३० वा. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयर्स,** मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५ येथे आयोजित केली असून सदर सभेचे कामकाज खालीलप्रमाणे होईल.

१) दि.२७.०८.२०२३ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा लेखी अहवाल वाचून मंजूर करणे.

२) चार्टर्ड अकौंटंटकडून तपासून आलेल्या २०२३-२०२४ च्या जमाखर्चा संबंधीचा अहवाल वाचून मंजूर करणे.

३) सन २०२४-२०२५ साठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

४) भावी कार्याची दिशा ठरविणे.

५) सन २०२४-२०२५ साठी लेखा तपासणीसाची नेमणूक करणे.

६) घटनेप्रमाणे मंडळाच्या कार्यकारीणीची उपस्थित सभासदांमधून निवड होईल.

७) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचा विषय असल्यास त्याचा विचार करणे.

**सूचना :-**

१) माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.

२) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी सकाळी ११.०० वाजता त्याच जागी ती सभा भरविण्यात येईल व वरील कामकाज पार पाडण्यात येईल.

३) वरील सभेत मांडण्यासाठी ठराव पाठवायचे असल्यास ते सूचक व अनूमोदक यांच्या पूर्ण नावासह आणि सह्यासह **दि.१५.०८.२०२४** पर्यंत मिळतील असे पाठवावेत.

*** आपले नम्र ***

**हौसाराम घोडके**
अध्यक्ष

**इंजि.विजयकुमार ठुबे**
अध्यक्ष, बांधकाम समिती

**मधुकर शिरोळे**
उपाध्यक्ष

**सुनील पोटे**
सेक्रेटरी

**प्रा.गोरक्ष जगताप**
सहसेक्रेटरी

**बाजीराव जगदाळे**
कार्यवाहक

**अशोक वाबळे**
सहकार्यवाहक

**सदस्य :- डॉ.बाळासाहेब बांडे, सखाराम गागरे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, रामदास शिर्के, बाळासाहेब येणारे, माधव गायके, सुनील निंबाळकर, किरण तिकोने, प्रमोद जगदाळे, राजाराम मुंढे.**

## * कार्यक्रमाचे स्थळ *

**इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयर्स,**

मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.

**रविवार दि. २५.०८.२०२४ रोजी सकाळी १०.०० वा.**

**संपर्क - श्री.सुनील पोटे ९२२६९२१०८८**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं.१७/४अ, मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेचा वार्षिक स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम **रविवार दि. २५.०८.२०२४** रोजी **सकाळी १०.०० वा. इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीयर्स,** मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११००५ येथे खालील सन्माननियांच्या उपस्थितीत आयोजित केलेला आहे.

*** अध्यक्ष ***

**मा.डॉ.महेश दळे**

आय.डी.ए.एस., अॅडीशनल कंट्रोलर अँड फायनान्सीयल अॅडव्हायझर,
मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया.

*** प्रमुख पाहुणे ***

**मा.रफीक नाईकवाडी,**

सह संचालक, कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य.

तरी आपण अवश्य उपस्थित रहावे, हि विनंती.

*** आपले नम्र ***

**हौसाराम घोडके** - अध्यक्ष

**इंजि.विजयकुमार ढुबे** - अध्यक्ष, बांधकाम समिती

**मधुकर शिरोळे** - उपाध्यक्ष

**सुनील पोटे** - सेक्रेटरी

**प्रा.गोरक्ष जगताप** - सहसेक्रेटरी

**बाजीराव जगदाळे** - कार्यवाहक

**अशोक वाबळे** - सहकार्यवाहक

**सदस्य :- डॉ.बाळासाहेब बांडे, सखाराम गागरे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, रामदास शिर्के, बाळासाहेब येणारे, माधव गायके, सुनील निंबाळकर, किरण तिकोने, प्रमोद जगदाळे, राजाराम मुंढे.**

*** कार्यक्रमाचे स्थळ ***

**इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीयर्स,**

मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.

**रविवार दि. २५.०८.२०२४ रोजी सकाळी १०.०० वा.**

**संपर्क - श्री.सुनील पोटे ९२२६९२१०८८**

**कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचा आस्वाद घ्यावा ही विनंती.**

# संपादकीय

प्रिय सभासद,

आपल्या **'पारनेर तालुका मित्र मंडळाला' स्थापन होऊन तब्बल ४४ वर्षे झाली आहेत. आता ४५ व्या वर्षात मंडळाची वाटचाल चालू** असून आता मंडळ खऱ्या अर्थाने पूर्ण झाले आहे, असे मला वाटते. विद्यार्थी वसतिगृह जरी १४ वर्षापूर्वी बांधले असले तरी विद्यार्थिनी वसतिगृहाचे आपले स्वप्न अद्याप पूर्ण झालेले नव्हते. **मंडळाचे अध्यक्ष श्री.घोडके अण्णा** यांच्या नेतृत्वामध्ये मंडळाचे रूपये १ कोटीच्या वर देणग्या गोळा केल्या व मंडळाने **रू.१.१५ कोटी किंमतीच्या विद्यार्थिनी वसतिगृहाची इमारत मंडळाने खरेदी केली आहे.** अल्पावधीमध्ये विद्यार्थिनी वसतिगृहही सुरु करण्यात येईल. बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित असलेले स्वप्न नुकतेच पूर्ण झाले आहे. आळंदी रोडवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये **वडमुखवाडीमध्ये असलेल्या साईबाबा मंदिराशेजारी असलेल्या प्लॉटमध्ये २५०० चौ.फुट क्षेत्रफळाचे तीन मजली बांधकामाची इमारत जागेसहीत खरेदी केली आहे. या खरेदीखतासाठी लागणाऱ्या कायदेशीर बाबींची पूर्तता व नोंदणी साठी ॲड.केदार भोसरेकर व ॲड.रोहन पारठे यांनी विनामूल्य काम केले आहे. त्याकरिता त्यांचे विशेष अभिनंदन.** मी सर्व सभासदांतर्फे आदरणीय घोडके अण्णा व मित्र मंडळाचे सर्व कार्यकारिणी सदस्य यांचे अभिनंदन करतो व त्यांना धन्यवादही देतो. एवढी मोठी ध्येयपूर्ती झाल्यानंतरही आपणास आणखी मोठी मजल मारायची आहे. त्यामुळे आपण सढळ हाताने मित्र मंडळास आर्थिक मदत करावी असे आवाहन करतो.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आपल्या मंडळाचा **स्नेहमेळावा तसेच विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव सोहळा पुणे येथील 'इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स' येथे रविवार दि. २५ ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित केला आहे.** त्यासाठी आपल्या मंडळावर नेहमीच प्रेम करणारे आपल्या तालुक्यातील रहिवासी केंद्रीय शासनातील संरक्षण खात्यातील सनदी तरुण अधिकारी **डॉ.महेश दळे, IDAS** व महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातील सहसंचालक पदावर कार्यरत असलेले अधिकारी **श्री.रफीक नाईकवाडी** हे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. आपण सर्वांनी सहकुटुंब येऊन या कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही विनंती. येताना नवीन पारनेरकरांना जरूर सोबत आणावे म्हणजे त्यांची इतर पारनेरकरांशी ओळख होईल. प्रेमाची नाती वृद्धींगत होतील. **२५ ऑगस्ट ही तारीख आत्ताच राखीव ठेवावी ही विनंती.**

विशेष अभिमानाची बाब म्हणजे **दैठणे गुंजाळ येथील श्रीमती सविताताई गुंजाळ यांनी त्यांचे पती कै.संभाजी भगवंतराव गुंजाळ यांचे स्मृतीप्रित्यर्थ मंडळास रूपये एक लाख रूपयांची देणगी दिली आहे.** त्यांच्या योगदानासाठी मी कृतज्ञता व्यक्त करतो. या वर्षी **चि.वरद चत्तर याने १६ वर्षांखालील क्रिकेटमध्ये नैपुण्य** दाखविले आहे तर **चि.रजत चव्हाण याने इस्त्रोतर्फे घेतलेल्या स्पर्धेमध्ये 'तरुण संशोधक'** म्हणून नंबर पटकावला आहे. त्यांचे मंडळातर्फे मी हार्दिक अभिनंदन करतो व शुभेच्छा देतो!

पारनेर तालुक्यासाठी विशेष अभिमानाची घटना म्हणजे **२०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये आपल्या तालुक्यातील हंगा येथील रहिवासी व पारनेर तालुक्याचे आमदार श्री. निलेश लंके यांची दक्षिण अहमदनगर लोकसभा मतदार संघातून खासदार म्हणून निवड झाली आहे. पारनेर तालुक्याचे प्रथम खासदार झाल्याबद्दल श्री.निलेश लंके यांचे मंडळातर्फे हार्दिक अभिनंदन. त्यांचेकडून पारनेर तालुक्याचे नांव मा.हजारे अण्णानंतर देशपातळीवर उज्वल करण्यासाठी प्रयत्न होवोत, ही जिजाऊचरणी प्रार्थना!** या अंकात **निलाक्षीताई काळे-सालके यांनी 'मातृगंध'** या माध्यमातून मराठी भाषा संवर्धनाचे केलेले काम 'कर्तृत्व पारनेरकरांचे' या सदरांतर्गत आपल्यापर्यंत पोहोचवत आहोत. या वर्षात यश मिळविलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे, यशवंत सभासदांचे मी मनापासून हार्दिक अभिनंदन करतो. त्यांना सुयश चिंतीतो व माझ्या संपादकीयास अर्धविराम देतो!!

**जय जिजाऊ! जय शिवराय!!**

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | |
|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | अध्यक्ष | ९४२०६९६७९० |
| इंजि.विजयकुमार ठुबे | अध्यक्ष,बां.स. | ९४२२०२६२२५ |
| श्री.मधुकर शिरोळे | उपाध्यक्ष | ९९२२१६६१२५ |
| श्री.सुनील पोटे | सेक्रेटरी | ९२२६९२१०८८ |
| प्रा.गोरक्ष जगताप | सहसेक्रेटरी | ९८६०९०७६१८ |
| श्री.बाजीराव जगदाळे | कार्यवाहक | ९०११०२१४३० |
| श्री.अशोक वाबळे | सहकार्यवाहक | ९८८१६०८३५७ |
| डॉ.बाळासाहेब बांडे | सदस्य | ९८२२०५१५९३ |
| श्री.सखाराम गागरे | सदस्य | ९७३००७५०३३ |
| श्री.भाऊसाहेब नरड | सदस्य | ९७६७७२५८११ |
| श्री.रामदास शिर्के | सदस्य | ९४२२०१६७६४ |
| श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |
| श्री.बाळासाहेब येणारे | सदस्य | ९९२२९६४८२५ |
| प्रा.माधव गायके | सदस्य | ९८२२९९५०९७ |
| प्रा.सुनील निंबाळकर | सदस्य | ९४२२२२२०३० |
| श्री.किरण तिकोणे | सदस्य | ९८२२३४६१३८ |
| श्री.प्रमोद जगदाळे | सदस्य | ९५७९६७४८१७ |
| श्री.राजाराम मुंढे | सदस्य | ९५२७४४५७५७ |

## वसतिगृह प्रवेश

**श्री.प्रमोद देशपांडे - ७५०७०६४५८८ श्री.दयानंद पतंगे - ९५७९८७०८३९**

# विद्यार्थी गौरव १० वी – २०२४



कु. आरुष राहूल जाधव, पाडळी दर्या, ९६%



कु. आदित्य सुधाकर औटी, पारनेर, ९२%



कुमारी काव्यांजली प्रविण मातेरे, बाभुळवाडे, ९१%



कु. सौरभ प्रमोद नरसाळे, गोरेगाव, ८७%



कु. वरद संजय चत्तर, सिद्धेश्वरवाडी, ८४%



कु. पार्थ विजय लोंढे, कान्हुर पठार, ८४%



कु. ओंकार निळकंठ खराडे, निघोज, ८२%



कुमारी ऋतुजा हेमंत थोरात, वाळवणे, ७३%



कुमारी तनिष्का भगवान चितळकर, रायतळे, ७१%



कु. मानस राजेंद्र साबळे, रुई छत्रपती, ६०%

# विद्यार्थी गौरव १२ वी सायन्स – २०२४



कुमारी श्रेया राजेंद्र ठाणगे, करंदी, ८९%



कु. श्रेयस संतोष कुलकर्णी, बाभुळवाडे, ८२%




कु. ओम प्रविण मातेरे, बाभुळवाडे, ८१% सीईटी ९९.२७%



कुमारी नुपुर रामदास पुजारी, पारनेर, ७८%



कुमारी अक्षदा संतोष ठुबे, तराळवाडी, ७६%



कु. आयुष चंद्रकांत खोडदे, किन्ही, ७५%



कुमारी ईशा प्रमोद नरसाळे, गोरेगाव, ७४%



कु. आर्यन प्रदिप कामठे, लोणी मावळा, ७३%



कु. सिद्धार्थ जयंत घोडके, पारनेर, ६९%



कु. यश केशव गायखे, कान्हुर पठार, ६८%



कुमारी अरुंधती पोपट घुले, पिंपळगाव रोठा, ६६%



कु. सोहम प्रविण शिंदे, सारोळे अडवाई, ६६%



कु. धनराज संदिप कारखिले, राळेगण थेरपाळ, ६५%



कु. हर्ष तुषार खिलारी, टाकळी ढोकेश्वर, ६२%



कुमारी मिताली राजकुमार खिंवसरा, कान्हुर पठार, ६०%

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !**

# रू.५०,००० पेक्षा जास्त देणगी देणारांचा सत्कार



कै.संभाजी गुंजाळ

**श्रीमती सविता संभाजी गुंजाळ,** रा. गुंजाळ दैठणे यांनी त्यांचे पती **कै.संभाजी भगवंतराव गुंजाळ** यांच्या स्मृतीप्रित्यर्थ्य मंडळाच्या वसतिगृहाच्या एका खोलीसाठी रू.१,००,०००/– देणगी दिली.



श्रीमती सविता गुंजाळ

## अभिनंदन



* **मा.खासदार निलेशजी लंके** यांची २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत दक्षीण अहमदनगर लोकसभा मतदार संघातून खासदार पदी निवड झाली.



* **श्री. अनिल दत्तात्रय ठुबे,** रा. कान्हूर पठार हे जनता शिक्षण संस्थेच्या श्री शिवाजी विद्या मंदिर, चाकण येथे कार्यरत असून त्यांची **प्राचार्य पदी** पदोन्नती झाली आहे.



* **सौ. सुषमा दत्तात्रय बांडे,** रा. टाकळी ढोकेश्वर या पुणे महानगरपालिकेच्या **हंबीरराव मोझे प्राथमिक विद्यालय,** चंदननगर येथे कार्यरत असून त्यांची **मुख्याध्यपक पदी पदोन्नती** झाली आहे.



* **कु. राजश्री विलास पुजारी,** पुणेवाडी ही विद्यार्थीनी रशियन विद्यापीठामधून **एम.बी.बी.एस.**च्या पहिल्या वर्षी **विशेष श्रेणीमध्ये उत्तीर्ण** झाली.

## ग्रामस्थ सत्कार



* **कु. शुभम विजयकुमार गांधी,** रा. पळशी हा **फिलीपाईन** या देशामधील **विद्यापीठामधून एम.बी.बी.एस.** झाला असून तो भारत सरकारची भारतात प्रॅक्टीस करण्याकरीता झालेल्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाला आहे.



* **श्री. शुभम सुरेश काळे,** रा. पिंपरी जलसेन हे बी.टेक्. मेकॅनिकल असून त्यांनी **अमेरिकेतील क्लेमसन विद्यापीठा मधून मास्टर इन मेकॅनिकल इंजिनियरींग (एम.एस.)** ही पदवी प्राप्त केली.

## ग्रामस्थ सत्कार



* **सौ. निलाक्षी सुधीर काळे–सालके** या रा. जवळे या **मराठी भाषा संवर्धनासाठी मातृगंध या संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्र तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर त्या कार्यरत आहेत.** त्यांना आतापर्यंत अनेक पुरस्कारांनी सन्मानीत केले आहे.



* **पल्लवी पद्माकर आढाव,** रा. सांगवी सुर्या यांना **ऑल इंडिया लेव्हल फॅशन डिझाईनच्या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षिस प्राप्त** झाले आहे. त्या **मास्टर इन फॅशन मॅनेजमेंट, एम.बी.ए. मार्केटींग असून सध्या फॅशन डिझाईनमध्ये पी.एच.डी.** करीत आहे. त्यांचा स्वतःचा फॅशन स्टुडीओ आहे.



* **ॲड. ऋषीकेश सुरेश भागवत,** रा.कान्हुर पठार हे **केंद्र सरकारच्या इन्स्टिट्यूट ऑफ बँकींग ॲंड पर्सनल सिलेक्शन बोर्डातर्फे** घेण्यात आलेल्या **परीक्षेमध्ये बृहनमुंबई महानगरपालिकेमधील विधी खात्यामध्ये त्यांची सहाय्यक कायदा अधिकारी (श्रेणी–२)** या पदावर निवड झाली आहे.



* **कु. यजत राजेंद्र चव्हाण,** रा. टाकळी ढोकेश्वर हा विद्यार्थी भारती विद्यापीठ लोहगाव येथे ९वी मध्ये शिकत असून त्याची **अहमदाबाद येथील ईस्रो या संस्थेत देशपातळीवर झालेल्या स्पर्धेत यंग सायंटिस्ट प्रोग्रॅम मध्ये निवड** झाली. एकंदर ३०० मुलांमध्ये त्याचा ३८ वा नंबर आला.



* **कु. वरद संजय चत्तर,** रा.सिद्धेश्वरवाडी हा ११वी मध्ये शिकत असून महाराष्ट्रा– तर्फे त्याची **१६ वर्षाखालील क्रिकेट टिममध्ये निवड** होऊन त्यांने **विजय मर्चंट क्रिकेट लिगमध्ये महाराष्ट्रातर्फे प्रतिनिधीत्व** केले.

# सेवानिवृत्ती



* **श्री. हरीभाऊ तात्याबा शेळके,** रा. नारायण गव्हाण हे डी.वाय.पाटील पब्लिक स्कुल पिंपरी येथे माध्यमिक विद्यालयामध्ये गणिताचे शिक्षक म्हणून कार्यरत होते. ते दि.३१.०८.२०२३ रोजी २२ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त श्री.शेळके यांनी मंडळास **रू.**५,०००/- देणगी दिली.



* **श्री. शरद गणपतराव गाडगे,** रा.विरोली हे अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. येथे जॉईंट चिफ जनरल मॅनेजर या पदावर कार्यरत होते. ३८ वर्षांच्या सेवेनंतर ते दि.०५.०४.२०२४ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त श्री.गाडगे यांनी मंडळास **रू.**५,०००/- देणगी दिली.



* **श्री. दत्तात्रय जयवंतराव बांडे** रा.टाकळी ढोकेश्वर हे आयडीयल इंग्लिश स्कुल पुणे येथे माध्यमिक शिक्षक म्हणून कार्यरत होते. ३५ वर्षांच्या सेवेनंतर ते दि.२९.०२.२०२४ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त श्री.बांडे यांनी मंडळास **रू.**२,०००/- देणगी दिली.



* **श्री. सतीश नारायण केळकर,** रा. जामगाव हे टेक्नोफोर इलेक्ट्रॉनिक्स प्रा.लि. कंपनी मध्ये स्टोअर ऑफिसर म्हणून कार्यरत होते. २८ वर्षांच्या सेवेनंतर ते दि.११.०५.२०२४ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त श्री.केळकर यांनी मंडळास **रू.**२,०००/- देणगी दिली.



* **सौ. माधवी महादेव आंबेडकर,** रा.हत्तलखिंडी या जिजाई शिक्षण मंदिर प्राथमिक शाळा, जहांगीर नगर, हडपसर, पुणे येथे प्राथमिक शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. त्या दिनांक ३०.०६.२०२४ रोजी ३९ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्या. त्यानिमित्त सौ. आंबेडकर यांनी मंडळास **रू.**२,०००/- देणगी दिली.



**विद्यार्थी गौरव**
**१२ वी कॉमर्स**

कुमारी प्राप्ती अरविंद ढोले,
सुपे, ८८.३०%



# निधन वार्ता



* **श्रीमती सत्यभामा भिवाजी साळवे,** वय ८३, रा. कान्हुर पठार यांचे **दि.** ०६.०२.२०२४ रोजी निधन झाले.



* **ॲड. हरकचंदजी तिलोकचंदजी गांधी,** वय ८५, रा. पारनेर यांचे **दि.** १७.०३.२०२४ रोजी निधन झाले. ते पारनेर येथे वकीली करीत होते.



* **गुलाबराव पाराजी जगदाळे,** वय ७९, रा. बाभुळवाडे यांचे **दि.** ३०.०४.२०२४ रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.संतोष** यांनी मंडळास **रू.**५०००/- देणगी दिली.



* **नामदेव सिताराम खोडदे,** वय ८२, रा. गांजीभोयरे यांचे **दि.** ०६.०५.२०२४ रोजी निधन झाले.



* **दशरथ रामभाऊ वीर,** वय ८३, रा. अस्तगाव यांचे **दि.** ०९.०५.२०२४ रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.सुनील** यांनी मंडळास **रू.**२०००/- देणगी दिली.



* **केशवराव भगवंतराव वाबळे,** वय ९३, रा. घाणेगाव यांचे **दि.** १०.०५.२०२४ रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.विठ्ठलराव** यांनी मंडळास **रू.**५०००/- देणगी दिली.



* **अरुण वामन कुलकर्णी,** वय ८३, रा. कासारे यांचे **दि.** ०३.०६.२०२४ रोजी निधन झाले.



* **डॉ. माधवराव भाऊराव रेपाळे,** वय ८८, रा. पुणेवाडी (हल्ली मु.कर्जत) यांचे **दि.** २९.०६.२०२४ रोजी निधन झाले.

# मातृगंध – मराठी भाषा संवर्धन सह वाचन संस्कृती जपण्याचा वसा.



**सौ.निलाक्षी काळे – सालके**
मास्टर ऑफ कॉम्प्युटर सायन्स, एम.बी.ए., एम.ए. (मराठी)
**संपर्क** – ९८८१९९८८४४ /८४५९६०११८१
ए १०१, शिवसाई रेसिडेन्सी, पिंपळे गुरव, पुणे – ४११०६१
**मातृगंध फाउंडेशन – संस्थापिका अध्यक्षा**
**आधार शैक्षणिक संस्था – सदस्य**

**जवळे गावातील सौ. निलाक्षी सुधीर सालके–पाटील** या पुण्यामध्ये एका नामांकित IT कंपनीमध्ये प्रोजेक्ट मॅनेजर पदावर कार्यरत आहेत. **या सोबतच समाजासाठी काही देणं लागतो या विचाराने त्या मराठी भाषा संवर्धन आणि वाचन संस्कृतीची वाढ याकरिता मोलाचे कार्य करत आहेत त्याकरिता त्यांनी मातृगंध नावाची संस्था सुरु करून गेल्या ३ वर्षांपासून त्या माध्यमातून त्या कार्यरत आहेत.**

**मातृगंध सुरुवात –** सभोवतालची, कुटुंबातील आणि नात्यातील मुलं यांच्याशी अनेकदा संवाद साधताना लक्षात आलं की मातृभाषा मराठी असूनही त्यांना शाळेत मराठी हा विषय सगळ्यात अवघड जातो. त्यांच्या मराठी बोलण्यात कितीतरी इंग्रजी शब्द येतात तेंव्हा या विचारातून आपण यासाठी काहीतरी करायला हवे हे मनाने ठरविले आणि २६ जून २०२१ (राजर्षी शाहू महाराज जयंती) रोजी मातृगंध नावाने ऑनलाईन माध्यमातून सुरुवात केली.

**मातृगंध कार्य–** मराठी भाषा संवर्धनाकरिता ५ ते १५ वयोगटातील मुलांकरिता दर शनिवार–रविवार व सुट्टीच्या दिवशी मराठी वाचन कट्टा घेतला जातो. आजवर ४७५ सत्र पूर्ण झालेले आहेत. निरनिराळे बालसाहित्य वाचन, माहितीपूर्ण लेखन (पत्रलेखन, निबंधलेखन, वक्तृत्व, चर्चा) व मराठी संस्कृती ची ओळख आणि माहिती मुलांपर्यंत पोहोचवणे. उन्हाळी शिबीर, दिवाळी शिबीर, नाताळ शिबीर, शिवजयंती–नाचून नाहीतर वाचून, खारीचा वाटा (झाडे लावा झाडे जगवा), आम्ही चालवू हा पुढे वारसा, मराठी पुस्तक भिशी यासारख्या निरनिराळ्या उपक्रमांचा समावेश मातृगंध मध्ये केलेला आहे.

आजवर लहान मोठी १५० पेक्षा जास्त पुस्तके वाचून पूर्ण. विशेष म्हणजे प्रत्येक १००,२००, ३००, ४०० या सत्रात एक बैठक पुस्तक वाचन केलेले आहे ज्यामध्ये प्रकाशवाटा, अग्निपंख, ताई मी कलेक्टर व्हयनु, मन मे हे विश्वास या पुस्तकांचा समावेश आहे. या विशेष सत्रांमध्ये संपूर्ण कुटुंबे सहभागी झालेली होती. लवकरच ५०० व्या सत्रात संगीता बर्वे लिखित पियूची वही या नव्या पुस्तकाचे एकबैठक वाचन करणार आहोत.

मराठी पुस्तक भिशीचे तिसरे वर्ष सुरु असून १५ ऑक्टोबर ला वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून वाचाल तरच वाचाल हा उपक्रम राबवून त्या अंतर्गत वाचनापासून वंचित मुलाना पुस्तके आणि वाचनाचे महत्व याबद्दल मार्गदर्शन करण्यात येते, यासाठी विशेषकरून महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील शाळा निवडल्या जातात आणि त्यांना प्रत्यक्ष भेट दिली जाते. आजवर या भेटींमध्ये हजारो पुस्तके शाळांच्या ग्रंथालयांना भेट देण्यात आलेली आहेत.

१५ ऑक्टोबर २०२३ या दिवशी वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून बऱ्याच जणांच्या आग्रहास्तव मोठ्यांसाठी पुस्तकमैत्री नावाने ऑनलाईन वाचन कट्टा सुरु करण्यात आलेला आहे. आज पावेतो या कट्ट्यावर सुखाचा शोध (वि स खांडेकर), कथाकथनाची कथा (व पु काळे), डॉलर बहू (सुधा मूर्ती), कुरूप (अण्णाभाऊ साठे), वारी (व्यंकटेश माडगूळकर) ह्या पुस्तक वाचनांचा आनंद घेतला. एकूण २५ सत्र या कट्ट्याने पूर्ण केली आहेत.

२०२४ च्या मराठी भाषा उन्हाळी शिबिरात ऑनलाईन माध्यमातून सुप्रसिद्ध बालसाहित्यकार एकनाथ आव्हाड आणि सुप्रसिद्ध लेखक व कवी देवा झिंजाड यांनी मातृगंध शिलेदारांशी उत्तम संवाद साधून मार्गदर्शन केले.

मातृगंधच्या तृतीय वर्धापनदिनानिमित्त शैक्षणिक समुपदेशक मा. मंजुषा वैद्य यांनी ऑनलाईन माध्यमातून सर्वांना उत्तम मार्गदर्शन केले.

**कार्य दखल –**

१) १०० सत्र झाल्यावर सकाळ ने दखल घेतली.
२) महिला दिन २०२२ ला कॉसमॉस बँकेने कार्याची दखल घेतली.
३) ८ मार्च २०२३ ला कनि महिला मंच यांच्याकडून शैक्षणिक क्षेत्राकरिता सन्मान.
४) १ मे २०२४ ला राजर्षी शाहू वाचनालय, पुणे यांच्या वतीने राजर्षी शाहू गौरव पुरस्कार.

पुणे, मुंबई, अहिल्यानगर, ठाणे, लातूर, छ. संभाजीनगर, सातारा, कोल्हापूर, नागपूर, धाराशिव, गोवा इत्यादी, अर्थात संपूर्ण महाराष्ट्रातून तसेच महाराष्ट्राबाहेरुनही मुलं मातृगंध च्या सर्व उपक्रमात सहभागी होता. याशिवाय अमेरिका, कॅनडा, यु. के., युरोप, ऑस्ट्रेलिया, यु. ए. इ.  (दुबई, अबुधाबी) या देशांमध्येही यावर्षीपासून त्या त्या देशातील मुलांचं वेळेनुसार मराठी भाषा शिबीर आयोजित करण्यास सुरुवात झाली आहे. उत्तम प्रतिसाद या शिबिरांमधून लाभलेला आहे.

**सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे भाषेची सेवा किंवा भाषेचं देणं आणि देशासाठी कर्तव्य म्हणून मातृगंध सर्व कार्य विनामूल्य करत आहे आणि हे कार्य असेच अव्याहत चालू राहील याची खात्रीही देत आहे.**

त्यांची मराठी भाषा आणि वाचन या संदर्भातील काही तत्वे – **• मातृभाषेला मित्रभाषा बनवा, मात्रभाषा बनवून मृतभाषा बनवू नका. • वाढवू मराठी, गाजवू मराठी, बाळकडू म्हणून पाजवू मराठी. • आपल्या मुलाने वाचावे वाटत असेल तर आपण आधी पुस्तक वाचायला हवे. • वाचाल तरच वाचाल.**

मातृगंध ब्रीद वाक्य – **मी मराठी ! माझी मातृभाषा मराठी !!**

।। विना सहकार नाही उद्धार ।।

# श्री साईबाबा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित



नोंदणी क्र.: पीएनए/एचएलआय/आरएसआर
/९४१/१९९३-९४ स्थापना : ३ मे १९९३

आशियाना टॉवर्स, सातपुडा हौसिंग सोसा.
सांगवी, पुणे - २७. मो.: ९०११९५५८११०

मूळच्या अ'नगर जिल्ह्यातील परंतु पुणे येथे स्थायीक झालेल्या मंडळींनी सामाजिक जाणीवेचे भान ठेवून स्थापित केलेली व अल्पावधीत सभासदांच्या विश्वासास पात्र ठरलेली पतपेढी. संस्थेची वैशिष्ट्ये–

✤ संस्थेच्या मालकीचे संगणकीकृत कार्यालय ✤ तत्पर सेवा ✤ ठेवीवर आकर्षक व्याजदर
✤ सभासदांच्या गुणवान पाल्यांचा यथोचित सत्कार ✤ विनयशील कर्मचारी वर्ग
✤ सभासदांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यावर जास्तीत जास्त भर.



श्री.सखाराम कोंडिबा गागरे
संस्थापक अध्यक्ष




श्री.अरुण मार्तंड नरसाळे
अध्यक्ष



श्री.कुंडलिक विश्वनाथ घोडके
उपाध्यक्ष



श्री.पोपटराव आनंदराव जाधव
संचालक



श्री.गोविंद दामोधर ढोरमले
संचालक



श्री.निशांत रंगनाथ गिरी
संचालक



श्री.सोमा भिमा दाते
संचालक



सौ.अलका दिलीप हरेल
संचालिका



श्रीमती राधाबाई मुरलीधर चौधरी
संचालिका

## मुदत ठेव व्याजदर

(०१.०९.२०२२ पासून लागू)

| | |
|---|---|
| ४६ दिवस पुर्ण ३% | ६ महिने पुर्ण ४% |
| ०९ महिने पुर्ण ५% | १२ महिने पुर्ण ७% |
| जेष्ठ नागरिक ०.५% जास्त | |
| मासिक व्याज ६.५% | |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## जमा-खर्च पत्रक १.४.२०२३ ते ३१.०३.२०२४ अखेरचे

| जमा | रक्कम रू. | रक्कम रू. | खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| **आरंभीची शिल्लक** | | | **व्यवस्थापन खर्च** | | |
| रोख | २३,०१४.०० | | टायपींग व झेरॉक्स खर्च | ४,१२०.०० | |
| स्टेट बँक २०७५४ | ३९,८४३.४७ | | लिहीणावळ खर्च | १५,०००.०० | |
| सुवर्णयुग सह.बँक १७७० | १,७२,८९६.५५ | | बँक चार्जेस | २,०४७.३० | |
| महानगर को-ऑप.बँक ४४५ | ४,६५,७२६.५० | | मासिक सभा खर्च | २,१३३.०० | |
| महानगर को-ऑप.बँक १६१ | २५,७१६.६७ | | ऑफिस खर्च | ३,८१६.०० | |
| | ---------- | ७,२७,१९७.१९ | पोस्टेज खर्च | ८००.०० | |
| | | | छपाई खर्च | ३४,०६०.०० | |
| इमारत निधी | | १४,७१,७७६.०० | प्रोफेशनल चार्जेस | २८,५००.०० | |
| | | | स्टेशनरी खर्च | ७३९.०० | |
| मुदत ठेव व्याज खाते | ५,६४,९०८.०० | | प्रवास खर्च | १४,५५१.०० | |
| बचत ठेव व्याज खाते | ४,३१९.०० | | | -------- | १,०५,७६६.३० |
| | ---------- | ५,६९,२२७.०० | **उद्देशांवरील खर्च** | | |
| फॉर्म फी | ३,०६०.०० | | पगार खर्च | ७,१४,८७५.०० | |
| वसतिगृह विज बिल जमा | १,११,२३१.०० | | सफाई खर्च | २९,३६९.०० | |
| वसतिगृह दंड | ६७,३५०.०० | | शैक्षणिक मदत | ५,०००.०० | |
| वसतिगृह शुल्क | २५,७९,१३८.०० | | इलेक्ट्रीकल खर्च | ३,५१०.०० | |
| वसतिगृह देखभाल शुल्क | १५,०००.०० | | वीजबील खर्च | ३,९२,५९०.०० | |
| अभ्यासिका फी | ४९,७१६.०० | | उत्सव समारंभ खर्च | ४६,८०४.०० | |
| किरकोळ जमा | २१५.७१ | | इंटरनेट चार्जेस | १,१७,६००.०० | |
| रद्दी विक्री जमा | ३६०.०० | | देखभाल व दुरुस्ती खर्च | ५४,८७०.०० | |
| | ---------- | २८,२६,०७०.७१ | पाणी टँकर खर्च | ५,४२८.०० | |
| | | | वेबसाईट खर्च | ९,०००.०० | |
| | | | | --------- | १३,७९,०४६.०० |
| | | | पी.सी.एम.सी.कर | | १,४५,१६२.०० |
| | | | ऑडिट फी | | १७,५००.०० |
| वसतिगृह अनामत (डिपॉझीट) | | २,७५,०००.०० | आयकर २०२२-२३ | | ७०,५३२.०० |
| मुदत ठेव जमा | | ६८,४५,६४१.०० | किरकोळ खर्च | | ७६०.०० |
| मुदत ठेव व्याज येणे | | १,९९,६४१.०० | | | |
| टी.डी.एस. २०२२-२०२३ | | ३२,१९९.०० | वसतीगृह अनामत (डिपॉझिट) | | २,४३,६००.०० |
| | | | मुदत ठेव | | १,०२,१०,२९७.०० |
| | | | मुदत ठेव व्याज येणे | | ३,४३,६५१.०० |
| | | | टी.डी.एस. २०२२-२०२३ | | ११,६६७.०० |
| | | | टी.डी.एस. २०२३-२०२४ | | ५६,४९९.०० |
| | | | **अखेर शिल्लक** | | |
| | | | रोख | १४,९७३.०० | |
| | | | स्टेट बँक २०७५४ | ३१,१९४.४७ | |
| | | | सुवर्णयुग सह.बँक १७७० | ७७,५०१.२५ | |
| | | | महानगर को-ऑप.बँक ४४५ | २,१२,४३१.२१ | |
| | | | महानगर को-ऑप.बँक १६१ | २६,४२८.६७ | |
| | | | | --------- | ३,६२,५२८.६० |
| **एकूण रक्कम** | | **१,२९,४७,००८.९०** | **एकूण रक्कम** | | **१,२९,४७,००८.९०** |

| **सुनील पोटे** | **मधुकर शिरोळे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## उत्पन्न खर्च पत्रक १.४.२०२३ ते ३१.३.२०२४ अखेरचे

| खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. | उत्पन्न | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| **व्यवस्थापन खर्च** | | | मुदत ठेव व्याज खाते | ५,६४,९०८.०० | |
| टायपींग व झेरॉक्स खर्च | ४,१२०.०० | | बचत ठेव व्याज खाते | ४,३१९.०० | |
| लिहीणावळ खर्च | १५,०००.०० | | | ------- | ५,६९,२२७.०० |
| बँक चार्जेस | २,०४७.३० | | | | |
| मासिक सभा खर्च | २,१३३.०० | | फॉर्म फी | ३,०६०.०० | |
| ऑफिस खर्च | ३,८१६.०० | | वसतिगृह विज बिल जमा | १,११,२३१.०० | |
| पोस्टेज खर्च | ८००.०० | | वसतिगृह दंड | ६७,३५०.०० | |
| छपाई खर्च | ३४,०६०.०० | | वसतिगृह शुल्क | २५,७९,१३८.०० | |
| प्रोफेशनल चार्जेस | २८,५००.०० | | वसतिगृह देखभाल शुल्क | १५,०००.०० | |
| स्टेशनरी खर्च | ७३९.०० | | अभ्यासिका फी | ४९,७१६.०० | |
| प्रवास खर्च | १४,५५१.०० | | किरकोळ जमा | २५१.७१ | |
| | -------- | १,०५,७६६.३० | रद्दी विक्री जमा | ३६०.०० | |
| **उद्देशांवरील खर्च** | | | | ---------- | २८,२६,०७०.७१ |
| पगार खर्च | ७,१४,८७५.०० | | | | |
| सफाई खर्च | २९,३६९.०० | | | | |
| शैक्षणिक मदत | ५,०००.०० | | | | |
| इलेक्ट्रीकल खर्च | ३,५१०.०० | | | | |
| वीजबील खर्च | ३,९२,५९०.०० | | | | |
| उत्सव समारंभ खर्च | ४६,८०४.०० | | | | |
| इंटरनेट चार्जेस | १,१७,६००.०० | | | | |
| देखभाल व दुरुस्ती खर्च | ५४,८७०.०० | | | | |
| पाणी टँकर खर्च | ५,४२८.०० | | | | |
| वेबसाईट खर्च | ९,०००.०० | | | | |
| | --------- | १३,७९,०४६.०० | | | |
| पी.सी.एम.सी.कर | | १,४५,१६२.०० | | | |
| ऑडिट फी | | १७,५००.०० | | | |
| आयकर २०२२-२३ | | ७०,५३२.०० | | | |
| किरकोळ खर्च | | ७६०.०० | | | |
| घसारा इमारत | | ७,७१,८४३.०० | | | |
| घसारा फर्निचर | | १,५१,५९८.०० | | | |
| नफा ताळेबंदास वर्ग | | ७,५३,०९०.४१ | | | |
| **एकूण रक्कम** | | **३३,९५,२९७.७१** | **एकूण रक्कम** | | **३३,९५,२९७.७१** |


**सुनील पोटे**
सेक्रेटरी

**मधुकर शिरोळे**
उपाध्यक्ष

**हौसाराम घोडके**
अध्यक्ष

**मे.के.बी.साळुंके अँड कं.**
लेखा परीक्षक

**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी मदत**
**म्हणजेच आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी मदत !**
**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी आपण स्वतः मदत करा,**
**आपल्या नातेवाईक, मित्रांना मदत करायला सांगा !**




## -: विशेष सूचना :-

☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु असून विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देणे सुरु आहे.**

☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.

☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन 'संवाद' मधून करण्यात येईल.

☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ढुबे**
ए-६०५, "शुभकल्याण" नांदेड सिटी,
सिंहगड रोड, पुणे ४११०४१.
मो.: ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.सुनील कुंडलीक पोटे व मुद्रक श्री.सुनील मुरलीधर तोटे (suniltote11@gmail.com) (M: 9823415531) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून **'पारनेर भवन', मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३** येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.

या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

Website :
http://www.parnermitramandalpune.com/

श्रीमान ____________________

____________________

____________________

____________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
अध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.: ९४२०६९६७९०